भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DY 059014

25 SEP 2025

दिनांक वि.क्र. 22454 मुद्रांक शुल्क रक्कम - 500/-

दस्त नोंद करणार आहे का-होय/नाही, नोंदणी होणारे दु.नि.कार्या.--------

दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक / कारण ---------------- MOU

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता - नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता - अँड कॉमर्स कोल्हापूर

हस्ते नांव व पत्ता - अरुण शिंदे

मोबदला रक्कम - मिळकतीचे वर्णन --------------

मुद्रांक विक्रेत्याची सही /

परवाना तसेच मुद्रांक विक्रेत्याचे नांव व पत्ता - चंद्रकांत सिताराम पिंपळे (स्टॅम्प वेंडर) ला. नं. ११९/८८, कोड नं. २६०००३२ महालक्ष्मी चेंबर्स, शॉप नं. ई-२८ कोल्हापूर

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही /

श्री. चंद्रकांत सिताराम पिंपळे परवाना क्रमांक ११९/८८ दि. १४.६.८८ कोड नं. २६०००३२ महालक्ष्मी चे. कोल्हापूर.

TREASURY OFFICER KOLHAPUR

18 SEP 2025

STAMP HEAD CLERK TREASURY OFFICE KOLHAPUR (M.S.)

कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे

# नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स कोल्हापूर

आणि

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

या संस्थातील

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

दि. २७, सप्टेंबर २०२५

Scanned with OKEN Scanner

कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे

# नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स कोल्हापूर

आणि

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

थोर स्वातंत्र्यसेनानी, देशभक्त, रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी १९७१ साली नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स कोल्हापूरची स्थापना केली. कला आणि वाणिज्य शाखेमध्ये कनिष्ठ, पदवी व पदव्युत्तर (मराठी, इंग्रजी) स्तरावरील शिक्षण नाइट कॉलेजमध्ये दिले जाते. प्रतिकूल परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य नाइट कॉलेजने घडविले आहे. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) बेंगलोर यांच्याकडून कॉलेजला 'अ' (CGPA 3.12) मानांकन प्राप्त झाले आहे . शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आदी क्षेत्रात कॉलेज देदिप्यमान कामगिरी करीत आहे .

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधनकरणे हे संघाचे ध्येय आहे. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश केलेला आहे.

वरील नमूद केलेल्या **नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स कोल्हापूर** आणि **शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर** या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. २७, सप्टेंबर २०२५ रोजी करत आहेत.या कराराची उद्दिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.



Scanned with OKEN Scanner

- **उद्दिष्टये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक / दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयांच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणा-या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना- पत्रव्यवहार करणे.

- **एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.



Scanned with OKEN Scanner

- **अटी**

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३. कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४. सदर सामंजस्याचा कराराचा **कालावधी** हा करार केल्याच्या दिनांकापासून **दहा वर्षाचा** म्हणजेच **दि. २७, सप्टेंबर २०२५** ते **दि. २६, सप्टेंबर २०३५** आहे.

५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

- **समन्वय**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख काम करतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. खालील स्वाक्ष-यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिका-यांत होत आहे तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

**प्रा. डॉ. अरुण शिंदे**
**प्रमुख,मराठी विभाग**

**प्रा. डॉ. उत्तम पाटील**
**प्राचार्य**
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड कॉमर्स
कोल्हापूर

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR

**प्रा. डॉ. मातेश हिरेमठ**
**सचिव**
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ

**प्रा. डॉ. भरत जाधव**
सचिव व खजानीस
**अध्यक्ष**
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,\ कोल्हापूर.**



Scanned with OKEN Scanner